# को.ए.सो. आदर्श माध्यमिक विद्यामंदिर, शहापूर

अहवाल वर्षी को.ए.सो. आदर्श माध्यमिक विद्यामंदिर, शहापूर शालांत परीक्षा मार्च २०१६ चा शेकडा निकाल ९५.१२% लागला. कु. भाग्येश विकास भगत ह्या विद्यार्थ्याने ८७.६०% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकाविला तर कु. मयुरेश रामचंद्र भोईर ८३.८०% गुण मिळवून द्वितीय आणि कु. प्रथमेश राजेंद्र भगत याने ८३.४०% गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला.

तसेच शाळेत अहवाल वर्षी रोटरॅक्ट क्लब ऑफ शिवाजी पार्क दादर मुंबई मार्फत दि. ९ व १० एप्रिल २०१६ रोजी बियॉड बुक्स नावाचे उन्हाळी शिबीर विद्यार्थ्यांसाठी मोफत घेण्यात आले. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकास घडविण्याच्या दृष्टिने विविध विषयाची प्रात्यक्षिके, खेळ, स्पर्धा घेऊन बक्षिसे देण्यात आली विद्यार्थ्यांचे शिक्षणाबरोबर खूप मनोरंजन झाले.

शाळेस टाटा पॉवर कंपनीच्या माध्यमातून ८ वर्ग खोल्यांची नवीन इमारत व एक प्रशस्त हॉल, स्वच्छतागृह बांधून देण्यात आले. ह्या कामी शाळा समितीचे सभापती मा.सुधीरभाई थळे यांनी पाठपुरावा केला. तसेच कंपनीतर्फे ई-क्लास व्यवस्था उपलब्ध करून दिली.

१ जानेवारी २०१६ पासून शाळेस महाराष्ट्र शासनाचा आदर्श शिक्षक राज्य पुरस्कार प्राप्त झालेले मुख्याध्यापक श्री. श्रीकांत पाटील लाभल्यामुळे शाळेत शालोपयोगी नव-नवीन उपक्रम राबविले जात आहेत. त्यांची अलिबाग तालुका माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाच्या अध्यक्षपदी निवड झाली.

दि. २१ जून २०१६ रोजी शाळेत आंतरराष्ट्रीय योगदिन साजरा करण्यात आला.

संकल्प विद्यानिधी ट्रस्ट मुंबई तर्फे शाळेतील गरीब, गरजु, होतकरू विद्यार्थ्यांना प्रत्येकी रूपये १५००/- आर्थिक मदत व वाचण्यासाठी संस्कारक्षम पुस्तके देण्यात आली.

चालु अहवाल वर्षी शासकीय चित्रकला परीक्षेमध्ये एलिमेंटरी व इंटरमिजिएट मध्ये शाळेचा १००% निकाल लागला. शाळेतील विद्यार्थ्यांनी आंतरशालेय वाक्स्पर्धा, तालुका विज्ञान प्रदर्शन, तालुका क्रीडा स्पर्धामध्ये सहभाग घेतला.

प्रज्ञाशोध परीक्षेमध्ये कु. बिपाशा नरेश पाटील इ. ८ वी हिने यश संपादन केले. शाळेतील मार्च २०१६ च्या माध्यमिक शालांत परीक्षेतील सर्व यशस्वी ३९ विद्यार्थ्यांचा गुणगौरव रा.जि.प. च्या अर्थ व बांधकाम सभापती मा.सौ. चित्राताई आस्वाद पाटील यांच्या शुभहस्ते पार पाडला. या कामी टाटा पॉवर कंपनी व शाळा समिती सभापती मा.सुधीरशेठ थळे यांनी मौलिक सहकार्य दिले. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना तसेच जागतिक जलदिना निमित्ताने घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेतील विजेत्याना टाटा पॉवर कंपनीकडून बक्षिसे देण्यात आली. कार्यक्रमातील उपस्थित पाहुण्यांना शाळेची उत्तरोत्तर प्रगती होईल असे आश्वासन मा. मुख्याध्यापकांनी ह्या प्रसंगी दिले.



कु. भगत भाग्येश विकास
एस. एस.सी. (८७.६०%)



श्री. पाटील श्रीकांत सदानंद
अलिबागतालुका मुख्याध्यापक संघ
अध्यक्षपदी निवड




रोटरॅक्ट क्लबतर्फे आयोजित मोफत समर कॅम्प मध्ये मार्गदर्शन करताना शाळा समिती चेअरमन श्री. सुधीर थळे व इतर मान्यावर मंडळी



जागतिक पर्यावरण दिनी वृक्षारोपण करताना टाटा पॉवरचे सुरक्षा अधिकारी श्री. संजय वाघ व शाळा समिती चेअरमन श्री. सुधीर थळे व इतर मान्यावर



शाळेच्या विद्यार्थी गुणगौरव समारंभात मार्गदर्शन करताना रा.जि.प. अर्थ व बांधकाम सभापती सौ. चित्राताई पाटील शेजारी शाळा समिती चेअरमन सुधीर थळे व इतर मान्यवर